## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये झालेले द्वितीय अपिल

## अपिल क्रमांक : केआर -३४८/२०१७ मधील तक्रार क्र. ४३९/२०

अपिलार्थी श्री.दिलीप मुकूंद पाटील,

वसई बाजारपेठ, भंडारीआळी, ता. पो. वसई, जि. पालघर.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, अव्वल कारकून-निवडणूक शाखा,

उपविभागीय प्रांत अधिकारी यांचे कार्यालय,ता. पो .वसई जि. पालघर.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३/१०/२०१७**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १३/१०/२०१६ | -- | १७/११/२०१६ | -- |

अपिलार्थी यांनी आयोगास सादर केलेल्या दिनांक ३०/१/२०१७ रोजीच्या द्वितीय अपिलावर आज दिनांक ३/१०/२०१७ रोजी फास्ट ट्रॅक सुनावणी (Fast Track Hearing) घेण्यात आली. सदर सुनावणीस अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांचे प्रतिनिधि यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, त्यांच्या दिनांक १३/१०/२०१६ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही. सरकारी अधिकारी असताना सुध्दा चुकीचा व्यवहार केला, म्हणून माहिती मागितली. त्यांना माहिती नि:शुल्क देण्यात यावी.

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले की, अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. आजच्या सुनावणीस असे स्पष्ट झाले की, अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती त्रयस्थ पक्षाची आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ११ मधील तरतुदीच्या अनुषंगाने त्रयस्थ पक्षास त्यांचे मत व्यक्त करण्यासाठी संधी देऊन व अपिलार्थी यांनी सदर माहिती सार्वजनिक हिताशी संबंधित असल्याचे स्थापित केल्यावर पुढील कार्यवाही करण्यात यावी.

२. यास्तव अपील निकाली काढण्यात येत आहे.

सही/-

**(थँक्सी फ्रान्सिस थेकेकरा)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवीमुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३ ऑक्टोबर, २०१७.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना,**

प्रथम अपिलीय प्राधिकारी,उपविभागीय प्रांत अधिकारी,ता. पो. वसई जि. पालघर.

### विवेचन

तक्रारकर्ता श्री. दिलीप मुकूंद पाटील यांनी द्वितीय अपिल क्रमांक के.आर ३४८/२०१७ मध्ये आयोगाने दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, त्यांना अद्याप माहिती मिळाली नाही म्हणून आयोगाकडे दि. ८.११.२०१९ रोजी कलम १८ (१) (ग) खाली तक्रार दाखल केली आहे. या अपिलासंदर्भातील नस्तीवरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जे. डी. तुंबडे यांनी आयोगाच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना अद्याप माहिती दिलेली नसल्याची प्राथमिकरित्या आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहेत.

### आदेश

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जे. डी. तुंबडे तथा अव्वल कारकून-निवडणूक शाखा, उपविभागीय प्रांत अधिकारी यांचे कार्यालय, ता. पो .वसई, जि. पालघर यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १३.१०.२०१६ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाने

KOKAN BANCH

दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत कार्यवाही न केल्याने त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

सही/-

**(के.एल.बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ जानेवारी, २०२१.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी, उपविभागीय प्रांत अधिकारी, ता. पो. वसई, जि. पालघर.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जे. डी. तुंबडे तथा अव्वल कारकून-निवडणूक शाखा, उपविभागीय प्रांत अधिकारी यांचे कार्यालय, ता. पो .वसई जि. पालघर यांना विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून-निवडणूक शाखा, उपविभागीय प्रांत अधिकारी यांचे कार्यालय, ता. पो .वसई, जि. पालघर यांचेमार्फत प्रत रवाना.

**अपिल क्रमांक : केआर -३४८/२०१७ मधील तक्रार क्र. ४३९/२०**

अपिलार्थी श्री.दिलीप मुकूंद पाटील,

**सुनावणी** दिनांक ४.१२.२०२३ **( In Continuation of order dt. २२.१.२०२१)**

KOKAN BANCH

**<u>विवेचन</u>**

उपरोक्त आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-२० (१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण ३० दिवसांत आयोगास सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जे.डी तुंबडे, अव्वल कारकून, निवडणूक शाखा, उपविभागीय प्रात अधिकारी यांचे कार्यालय वसई आणि विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, श्री. अविनाश लोखंडे हे उपस्थित आहेत.

**सुनावणीचा तपशील :**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जे.डी तुंबडे, अव्वल कारकून, निवडणूक शाखा, उपविभागीय प्रात अधिकारी यांचे कार्यालय वसई यांनी दि.४.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये आयोगास लेखी खुलासा सादर केला आहे की, संदर्भाकीत द्वितीय अपिल दाव्याची संचिका पडताळणीकामी उपविभागीय अधिकारी वसई येथे दि.२.१२.२०२३ रोजी गेलो असता, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. अविनाश लोखंडे यांचे समवेत शोध घेतला असता संचिका आढळून आली नाही. त्यामुळे द्वितीय अपिलाचा विषय समजून आला नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता असे दिसून आले की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जे.डी तुंबडे, अव्वल कारकून, निवडणूक शाखा, उपविभागीय प्रात अधिकारी यांचे कार्यालय वसई यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत तसेच आयोगाच्या आदेशानंतरही उपलब्ध माहिती दिलेली नाही. तसेच सदरची उपलब्ध माहिती दिल्याबाबतचा कोणताही समर्थनीय खुलासा त्यांनी आयोगास सादर केलेला नाही.

सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आता आयोगाने दि.३.१०.२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशातील मुद्दा क्र.१ प्रमाणे कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करणे उचित होईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

(१) विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. अविनाश लोखंडे, अव्वल कारकून-निवडणूक शाखा, उपविभागीय प्रांत अधिकारी यांचे कार्यालय वसई यांनी आयोगाने दि.३.१०.२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशातील मुद्दा क्र. १ प्रमाणे कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा .

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जे.डी तुंबडे ,अव्वल कारकून ,निवडणूक शाखा ,उपविभागीय प्रात अधिकारी यांचे कार्यालय वसई यांनी सादर केलेला खुलासा असामाधानकारक असून त्यांचा दिनांक ४.१२.२०२३ रोजीचा

खुलासा अमान्य करण्यात येत आहे .त्यांना दि.२२.१.२०२१ च्या आदेशातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून २ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र. ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. या बाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल उपविभागीय प्रांत अधिकारी कार्यालय वसई, ता. पो.वसई, जि. पालघर यांनी आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

**(भूपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ डिसेंबर, २०२३

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई यांचे कार्यालय, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र. ५२७/५२८, कोंकण भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
३. उपविभागीय प्रांत अधिकारी कार्यालय वसई, ता. पो. वसई, जि. पालघर.
४. आहरण व संवितरण अधिकारी ,आस्थापना अधिकारी/ उपविभागीय प्रांत अधिकारी कार्यालय वसई, ता. पो. वसई, जि. पालघर.
५. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री,निवडणूक शाखा ,अव्वल कारकून ,तुंबडे .डी.जे . उपविभागीय प्रांत अधिकारी यांचे कार्यालय वसई, ता. वसई, जि. पालघर

**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपविभागीय प्रांत अधिकारी कार्यालय वसई, ता. वसई, जि. पालघर **यांचेमार्फत रवाना.**

KOKAN BANCH

KOKAN BANCH